विम बार प्रस्तुत ‘स्टार प्रवाह चैत्रचाहूल २०१५’

नव्या नात्यांची नवी गुढी!

पॉवर्ड बाय लक्स आणि वॉल्टारिन ऑईन्मेंट

**फायनल ड्राफ्ट**

संहिताः क्षितिज पटवर्धन

(FWA मेंबरशिप नंबर 015479)

इंद्रजिमी जंभपर या ढोलपथकाच्या ॲक्ट ने कार्यक्रमाची सुरुवात.

पडदा उघडतो आणि निवेदकांची दमदार एन्ट्री होते. जितेंद्र जोशी आणि स्पृहा जोशी.

स्पृहाः नमस्कार, विम बार प्रस्तुत स्टार प्रवाह चैत्रचाहूल २०१५ नव्या नात्यांची नवी गुढी, पॉवर्ड बाय लक्स आणि वोल्टारिन ऑईन्मेंट या कार्यक्रमात इथं उपस्थित असलेले,

जितेंद्रः आणि टेलिव्हिजनवर आतुरतेने बसलेले अशा सर्वांचं मी जितेंद्र,

स्पृहाः आणि मी स्पृहा जोशी,

दोघेः मनापासून स्वागत करतो!

स्पृहाः काय मग? काय विशेष?

जितेंद्रः विशेष आमच्याकडे नाही, तुमच्याकडे. लग्नानंतरचा पहिला गुढी पाडवा ना?

स्पृहाः हो. आमच्याकडे दणक्यात झाला. म्हणजे छान, साग्रसंगीत.

जितेंद्रः सोन्याबिन्याचं काहीतरी मागितलं असशीलच. आता म्हणू नकोस नवराच सोन्यासारखा आहे म्हणून. अतिशय टिपीकल आणि पन्नास वेळा ऐकलेल वाक्य आहे हे. तुम्हाला सांगतो मराठी बायका ना, जगात कुठेही असू देत, नवऱ्याच कौतुक करतात ते, तो समोर नसताना. समोर असताना म्हणतात अहो दगडासारखे बसून काय राहीलात? बाहेर मात्र, अगदी सोन्यासारखा नवरा आहे माझा!

स्पृहाः अनुभवाचे बोल. पण तुला माहीतेय, आज आमच्या इथे एक फार इंटरेस्टींग घटना घडली. शेजारी एक खूप म्हाताऱ्या आज्जी आल्या होत्या.

जितेंद्रः आता आज्जी म्हणजे म्हाताऱ्याच असणार ना?

स्पृहाः ऐक तर. या नव्वद वर्षांच्या, अशा छान कानात मोत्याच्या कुडया घातलेल्या, कमेरला अत्तर लावलेला रुमाल खोचलेल्या, जरीची नऊवारी नेसलेल्या, वाकून चालणाऱ्या, पण हात धरु का विचारलं तर नाही म्हणणाऱ्या. त्यांना मी सहज विचारलं, तुम्हाला तुमचा सगळयात जुना गुढीपाडवा आठवतोय का हो? काय साल सांगितलं असेल त्यांनी? १९४७.

जितेंद्रः बाप रे. इथं आपल्याला गेल्या वीकेंड ला काय जेवलो होतो आठवत नाही.

स्पृहाः बघ ना. मला म्हणाल्या लग्नानंतरचा पहिला पाडवा होता. चाळीस माणसांचा स्वयपाक केला होता. पण अजूनही आठवतंय, उकडलेल्या बटाटयाच्या भाजीत मीठ कमी पडलं म्हणून हे ओरडले होते सगळयांसमोर.

जितेंद्रः घ्या. एकोणसत्तर वर्षांनी आज्जींना हा पाडवा का लक्षात आहेत आहे तर नवरा ओरडला म्हणून. कमाल आहे!

स्पृहाः जोक्स अपार्ट, पण अरे त्यांनी जे जे काय सांगितलं ना, अक्षरशः जिवंत चित्र उभं राहील डोळयासमोर. गावाकडची सकाळ, धुक्यातलं वातावरण, बंबातल्या पाण्याची गडगड, जात्यावरची डरडर, शेणाच्या गोळयाचा टाकल्यावर येणारा ठप असा आवाज, ंघंटेची किणकिण. स्वयपाकाचं सांगायचं तर रोटी मेकर शिवायची पोळी, मिक्सर शिवायची चटणी, कॉलस्टरॉल ची पर्वा न करता तळलेल्या पुऱ्या आणि साचा न वापरता केलेले उकडीचे मोदक.

जितेंद्रः आपली आयुष्यच आता इन्स्टंट पाकीटात येतात. तू बोल.

स्पृहाः असं ते सगळं ऐकून वाटलं, पुन्हा एकदा थोडया वेळाकरता त्या वातावरणात जाता आलं असतं तर? प्रसन्न सुरुवात, कोंबडयाची बांग, म्हशीचं हंबरणं, जात्याचं रगडणं, परत हे सगळ अनुभवता आलं तर किती मजा येईल. सकाळ पासून संध्याकाळ पर्यंतचा एक छान अनुभव मिळाला तर?

जितेंद्रः चला तर मग तयार होऊयात, कारण आता खूप मजा येणारे.

स्पृहाः ती कशी काय?

जितेंद्रः कारण स्टार प्रवाहचं आख्खं कुटुंब घेऊन येतंय या संध्याकाळचा पहिला अविष्कार.

स्पृहाः एक मिनिट. म्हणजे अक्कासाहेबही येणारेत आता?ज्यांच्यावर आख्खा महाराष्ट्र एवढा भरभरुन प्रेम करतो, बायका ज्यांच्यासारख्या रहातात, बोलतात. (एक्साईट) ए मला त्यांना प्रत्यक्ष बघायचंय.

जितेंद्रः चला मग, बोलवूया त्यांना? परंपरेची गुढी घेऊन येतायत स्टार प्रवाह कुंटुबातले सगळयात लाडके सदस्य! जोरदार टाळयांनी स्वागत करुया...

## (अॅक्ट १ः भूपाळी ते भैरवी.)

---

**(आता जितेंद्र एकटाच उभा आहे.)**

जितेंद्रः इतक्या सुंदर सुरुवातीनंतर आता आपण... अरेच्च्या? ही कुठे गेली. शंभर टक्के मागे जाऊन साडी आणि दागिन्याबददल विचारत बसली असणार अक्कासाहेबांना! तुम्हाला सांगतो बायकांना कनेक्ट व्हायला या कपडे आणि दागिने या दोन गोष्टी पुरेशा असतात. मित्रांनो आम्ही या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या विविध भागातून काही जणांना आमंत्रित केलंय, आपल्या स्टार प्रवाह कुटुंबासोबत गुढी पाडवा साजरा करण्यासाठी. तर, पहिल्या सेगमेंट मध्ये...

(दर्शन विंगेतून डोकावतो. जितेंद्र त्याच्याकडे पहातो. दर्शन लाजत त्याला हात करतो. जितेंद्र त्याला ओढत शेजारी उभा करतो. दर्शन आ वासून प्रेक्षकात पहातो. घाबरतो.)

दर्शनः फोटो काढायलाही लाजतो मी. इथं तर लाईव्हच आय की.

जितेंद्रः हे हरिभाऊ जाधव. खास कोल्हापूर हून आलेत. (त्याला) हरिभाऊ तुम्ही कार्यक्रमाची शोभा वाढवायला आला आहात, करायला नाही. या या. उभे रहा इथं.

दर्शनः (पाय बाहेर काढत) हे चांगलं आय की. पाय लटपटतायत कोणाला कळत नाहीये.

जितेंद्रः तर...

दर्शनः (खिशातनं एक चिठठी काढतो.) थांबा की जरा. आधी मला घरच्यांशी बोलू तर दे. हां, अंबिका मावशी, अंबाबाईच्या कृपेनं सुखरुप पोचलो. आई, सदाभाऊंना डोळा लागल्यामुळे दोनदा घाटातली ग्रीनरी जवळून पाहीली.

जितेंद्रः सदाभाऊ?

दर्शनः बसचे ड्रायवर. झोपतात ते कधी कधी. तर, अण्णा तुमचं दुखःहारी कुटकुटघरी तेल घेतलेलं आहे. ते म्हणाले सहा महिन्यात फरक नाही पडला तर बदला.

जितेंद्रः तेल?

दर्शनः वाटया, वाटया बदला गुडघ्याच्या. सौभाग्यवती मालती, मंदा, शकू, झालच तर पिपाण्या, तुताऱ्या यांना सगळयांना अनेक आशीर्वाद.

जितेंद्रः अहो तुम्ही पत्र लिहीताय का?

दर्शनः नाही साहेब, एकच मिनिट, (मोठयाने, बाहया सरसावत) आणि जनार्दन मान्या, लक्षात ठेवं, मी एकदा आयुष्यात टीवीवर जाईन असं बोललो होतो ते स्टार प्रवाह नं खरं केलेलं आहे. आज

उभा महाराष्ट्र आपल्याला आडवा होऊन पहातोय. (जितेंद्रला) साहेब, हा आमच्या गल्लीत रहातो. हयाच्याआयला... नागोबाला दूध!

जितेंद्रः काय?

दर्शनः नागोबाला दूध, कुंकवाच्या कर्जाला हळदीचं व्याज, आहेर नायतर बाहेर या सगळया पिक्चरमध्ये माग मॉब मधी होता, स्वतःच्या वाढदिवसाला तर फ्लेक्स लावला होता गल्लीत. सिनेवैभव जर्नादन माने. त्याला कोल्हापूरचा चित्रगुप्त म्हणतो आम्ही.

जितेंद्रः चित्रगुप्त?

दर्शनः तो ज्यात आहे तो चित्रपट गुप्तच होतोय. येतच नाही बाहेर. म्हणून त्याला म्हणलं. ऐ... जर्नादन, हे रेकॉर्ड करुन ठेवतोय मी. आपल्या वाढदिवसाला गल्लीत प्रॉजेक्टरवर एवढाच पार्ट परत परत लावणार. (थांबून) हां, असो, तर जवळपास हार्मोनियम कुठं मिळेल?

जितेंद्रः का हो?

दर्शनः आमची पोरगी है देवयानी. गाण्याची आवड आहे तिला. दिसायला एकदम तुमच्या दुर्वा सारखी आहे. नाजूक, सोशीक (जितेंद्र चक्रावून पहातो. दर्शन थांबून) आईवर गेलीये. ती गेली दोन वर्ष गाती. एक नंबर गाती हां साहेब. तिला म्हणलं होतं या पाडव्याला तुला हार्मोनियम घेऊन देईन. भावगीत गाती, नाटयगीत गाती, सेमी इंग्लीश करता करता सेमी क्लासिकल पण झालं तिचं. सर म्हणले चांगल्या हरकती घेती. म्हणलं आपली काय हरकत नाही. वर्षभर पैसे साठवलेत, यंदा पाडव्यापासनं घरी सुरांची गुढी उभी करायचीये साहेब. स्वतःचा देव्हारा केलाय छोटा, त्यात पार अगदी राहुल देशपांडयांपासनं प्रथमेश लघाटे पर्यंत फोटो लावलेत.

जितेंद्रः अरे व्वा. म्हणजे तुमचं देव दर्शन होणार आज.

दर्शनः मस्करी करताय काय?

जितेंद्रः अहो, जाधव साहेब, सगळे स्वरांचे देव आज इथं आलेत! चला मग, आधी इथली स्वरांची गुढी ऐकूया, आणि मग हार्मोनियम विकत घ्यायला एक पत्ता देतो. तिथं जाऊन या. आणि तुमच्या मुलीला शुभेच्छा दया. अजून दोन वर्षांनी याच कार्यक्रमात तिच्या गाण्याचा कार्यक्रम झाला पाहीजे. (दर्शन पाया पडायला जातो. जितेंद्र थांबवतो.)

जितेंद्रः प्रेक्षकहो, भान हरपायला लावेल अशी स्वरांची गुढी घेऊन येतायत, आजच्या घडीचे, पण दोन्ही पिढीचे प्रतिभावंत गायक प्रथमेश लघाटे आणि राहुल देशपांडे!

## (अॅक्ट २ः स्वरांची गुढी. राहुल देशपांडे, प्रथमेश लघाटे. )

---------------------------------------------------------------------------

(आता स्पृहा एकटी उभी आहे.)

स्पृहाः जितेंद्र हरिभाऊंना हार्मोनियम चा पत्ता सांगायला गेलाय. तोवर मी सुरुवात करते. आजचा हा गुढी पाडवा म्हणजे आपल्या संस्कृतीचं अस्सल प्रतीक. नुसतं संस्कृतीचं नाही. संस्कृती सोबत प्रगतीचं प्रतीक! याच निमित्तानं स्टार प्रवाह नं एक सन्मानही सुरु केला आहे. प्रवाहरत्न. नाटय, चित्रपट, टेलिव्हिजन, पत्रकारिता आणि सामाजिक बांधिलकी अशा वेगवेगळया प्रवाहांमध्ये लख्ख चमकणाऱ्या या रत्नांना हा सन्मान या वर्षीपासून दिला जाणार आहे. हा अशा मान्यवरांचा सन्मान आहे ज्यांनी 'संस्कृती सोबत प्रगती'ची गुढी इतक्या वर नेलीये, की आपण सगळे त्यांच्याकडे अभिमानाने मान वर करुन पहातो.

जितेंद्रः (आत येतो.) मला काय वाटतं सांगू? मला वाटतं, गुढी ही अशी एक दिवसाची नसतेच. ती रोज नव्याने उभी रहात असते. आपल्या विचारातून, आपल्या कामातून. माझ्यासाठी फाळक्यांनी हातात वर धरलेली फिल्म ही सुध्दा गुढी आहे आणि सचिन ने सेंच्युरी करुन वर घेतलेली बॅट सुध्दा गुढीच आहे. अशा कितीतरी गुढया आपली मराठी माणसं रोज उभारतायत. वेगवेगळया क्षेत्रात. अशाच मंडळींना हा प्रवाह रत्न सन्मान !

स्पृहाः या सन्मानाचा फॉरमॅट थोडा गंमतशीर आहे. इथं सिनीयर जुनियर किंवा लहान मोठा हा मुददा नाही, इथं मुददा आहे तो परस्परांबददलच्या आपुलकीचा, अभिमानाचा आणि आदराचा. अगदी सोप्प्या शब्दात सांगायचं तर एखादयाच्या कतृत्वापुढे आदरानं लीन होण्याचा आणि एखादयाच्या पाठीवर मनापासनं शाबासकी देण्याचा. पहिला सन्मान देण्यासाठी मी आमंत्रित करते रविकांत सबनवीस, जनरल मॅनेजर स्टार प्रवाह.

**रविकांत सबनवीस एन्ट्रीः**

जितेंद्रः सन्मान देण्याआधी मी त्यांना विनंती करतो की थोडक्यात या कार्यक्रमा मागची स्टार प्रवाहची भूमिका त्यांनी सांगावी.

**रविकांत सबनवीसः** स्टार प्रवाह ला मराठी प्रेक्षकांनी गेली सहा वर्ष जे प्रेम आणि पाठिंबा दिलाय, त्यामुळेच इथपर्यंत आम्ही आलो आहोत. हा सन्मान जसा या रत्नांचा आहे, तसाच प्रत्येक प्रेक्षकाचा आहे कारण तुम्ही नसतात, कारण जसं चांगली कलाकृती चांगले प्रेक्षक घडवते, तसंच चांगले प्रेक्षकही चांगली कलाकृती घडवतात. आमच्या कुटुंबावर प्रेम असंच राहू दया. तुमचं मनोरंजन हेच आमचं लक्ष्य आहे, आणि त्यासाठी वेळोवेळी आम्ही पुढचं पाऊल टाकत राहू!

जितेंद्रः वळूया सन्मानाकडे, काही सन्मान असतात, ते अशा व्यक्तींना मिळतात की त्यानी त्या सन्मानाचा सन्मान होतो. आजचा पहिला सन्मान हा दोन व्यक्तींना नसून एका ध्यासाला आहे. बाबा आमटेंच्या या मुलानं आपलं विकास हे नाव सार्थ ठरवत, तो समाजातल्या सगळयात गरज असलेल्या भागात पोचवला जगवला आणि रुजवला. मला वाटतं, एखादया देशाची खरी डेव्हलपमेंट मोजायची असेल तर उंच इमारती नाहीत, (विचारांनी) उंच माणसं मोजली पाहीजेत. आम्ही अभिमानानं सांगू आमच्याकडे विकास आणि भारतीताई आमटे आहेत. मी रविकांत सबनवीस, जनरल मॅनेजर स्टार प्रवाह यांना विनंती करतो की त्यांनी हा सन्मान या दाम्पत्याला दयावा.

## प्रवाह रत्न १: विकास आणि भारती आमटे :

स्पृहाः आता हाच सन्मान पुढच्या पिढीला देण्यासाठी मी त्यांना इथंच थांबायची विनंती करते. पुढचा सन्मान अशा दोन भावंडांना आहे, ज्यांनी तरुण वयात खूप मोठं संकट झेलून, महाराष्ट्रातली विवेकाची परंपरा चालू ठेवलीये, ती आणखी बळकट करण्याचा निर्धार केलाय. या मातीतलं अंधश्रध्देचं विषारी तणं मुळापासून उपटून तिथं नवा आधुनिक दृष्टीकोन ज्यांनी रुजवला त्या नरेंद्र दाभोळकरांचं काम आणखी जोमानं पुढं नेण्यासाठी मुक्ता आणि हमीद दाभोळकर यांनी हा सन्मान स्वीकारावा अशी मी त्यांना विनंती करते.

## प्रवाह रत्न २: मुक्ता आणि हमीद दाभोळकर

## (सगळयांची एक्झिट. फक्त रविकांत सबनवीस थांबतील.)

जितेंद्रः मान्यवरांचे आभार. सामाजिक क्षेत्रासारखंच आणखी एक महत्वाचं क्षेत्र म्हणजे पत्रकारिता. बातमीतली बात आणि मी याचं भान राखणारा हाडाचा पत्रकार म्हणजे आपल्या लोकशाहीचा चौथा स्तंभ. गेली अनेक वर्ष मराठी पत्रकारितेमध्ये आपला महत्वाचा ठसा उमटवणारं नाव म्हणजे राजीव खांडेकर.

स्पृहाः निर्भीड, निपःक्ष, आणि तटस्थ हे शब्द ऐकायला कठीण वाटतात पण एखादया पत्रकारासाठी त्याहूनही कठीण अशा शब्दांसोबतच जगणं असतं. मी राजीव खांडेकरांना रंगमंचावर यायची विनंती करते. हा सन्मान त्यांना देतील रविकांत सबनवीस.

**प्रवाह रत्न ३ः राजीव खांडेकर**

जितेंद्रः राजीवजींना विनंती, की पुढचा सन्मान मात्र तुम्ही दयायचाय. मराठी मनोरंजन पत्रकारितेमध्ये आघाडीचं नाव असलेल्या, आपल्या खास शैलीनं मराठी कलाकारांशी जिव्हाळयाचं आणि मराठी प्रेक्षकांशी विश्वासाचं नातं बनवणाऱ्या, तुमच्या आमच्या सगळयांच्या लाडक्या अमित भंडारी यांना.

**प्रवाह रत्न ४ः  अमित भंडारी**

**-----------------------------------------------------------------------------------**

जितेंद्रः या नंतर आपण पुढच्या कार्यक्रमाकडे वळणार आहोत.

(या नंतर कार्यक्रमात अंधार होतो.)

जितेंद्रः घाबरु नका. किंवा पॅनिक ही होऊ नका. तुमच्या पैकी अनेकांना असंही वाटेल की हे आमच्या चिंत्या आणि रुपालीचं काम आहे जे सतत सगळयात विघ्न आणत असतात. पण तसं काही नाहीये. आपण असे अनेक कार्यक्रम पाहीले असतील ज्यात मधूनच अंधार होतो. आम्हीही असे अनेक कार्यक्रम करतो की ज्यात कार्यक्रम करणाऱ्यांना शेवटपर्यंत अंधारात ठेवलं जातं. किंवा एकूणच सगळयाचाच अंधार असतो, पण आजची गम्मत काही वेगळी आहे.

स्पृहाः आपण सगळी मराठी माणसं ज्या एका धाग्यानी जोडली गेलो आहोत त्या आपल्या मराठी पणा बददलचा हा प्रवास. खरंतर प्रवाह. आपल्यावर सावली सारख्या उभ्या असलेल्या गोष्टींचा प्रवाह. मराठी टेलिव्हिजनवर आजवर कधीही न पाहीलेला हा सावलीचा खेळ! यातलं प्रत्येक दृश्याला तुम्ही टाळयांच्या गजरात दाद दयाल याची खात्री आहे!  सादर आहे, खास या कार्यक्रमासाठी बनलेला, प्रवाह महाराष्ट्राचा!

**(शॅडो ॲक्टः)**

**व्हॉईस ओव्हरः  प्रत्येक मराठी माणसाच्या मनाच्या कप्प्यात असलेलं आठवणींच पुस्तक! चला आज पुन्हा उघडून पाहूयात...**

पुस्तकः प्रवाह महाराष्ट्राचा : पुस्तक उघडतंः ज्ञानेश्वर महाराजांची आकृती दिसते. दिंडी चालत जाताना दिसते. मोठा भगवा झेंडा दिसतो. एक किल्ला होताना दिसतो. त्यावर तो भगवा झेंडा फडकतो आहे आणि कोपऱ्यात शिवाजी महाराज उभे दिसतात. शनिवार वाडा दिसतो. शेजारी घोडा तयार होतो. तो घोडा पळत पळत जातो. मागे पुणे, महाराष्ट्र दिल्ली, असा अटकेपार तो झेंडा रोवला जाताना दिसतो. एक माणूस दिसतो जो विमान उडवतो. विमान उडताना दिसतं. शेजारनं गणपती आणले जातात, त्यातही तो झेंडा नाचवला जातो. लोकमान्य दिसतात. केसरी आणि मराठा असे पेपर दिसतात. एक माणूस दिसतो. जो खुर्चीवर बसून आपल्या हाताने सिनेमाचं रीळ पहातो. दादासाहेब फाळके दिसतात. टिपीकल पोझ मधले बालगंधर्व दिसतात. तानपुरा घेऊन भीमसेन जोशी दिसतात. माईक्वर उभ्या लता मंगेशकर दिसतात. ऑलिंपीकचं चिन्ह  दिसतं आणि कुस्ती खेळणारा एक माणूस येऊन उभा रहातो. बॅट घेऊन सुनील गावसकर दिसतो. शेजारी एक लहान मुलगा दिसतो. तो मोठा मोठा होत जातो. क्रिकेटचं मैदान होतं. सगळयात शेवटी स्टान्स घेऊन उभा सचिन तेंडुलकर दिसतो. तो हेल्मेट  काढतो आणि बॅट वर करतो. गजर ऐकू येतो. त्या सरशी झेंडा डौलाने फडकत पडदया जवळ जवळ येतो आणि शॅडो ॲक्ट संपतो. पुस्तक बंद होतं शेवटी स्टार प्रवाह चा लोगो येतो.

**व्हॉईस ओव्हरः आठवणींचं पुस्तक, त्याला अभिमानाची पानं, त्याची अक्षरं मोत्यांची, आम्ही वाचतो गर्वानं!**

---------------------------------------------------------------------------

जितेंद्र आणि स्पृहा पुन्हा एकदा येऊन उभे रहातात.

स्पृहाः एकदा जोरदार टाळया फिरोज शेख डान्स अकॅडमी साठी. मला चार ओळी म्हणाव्याशा वाटतायत म्हणू?

जितेंद्रः अगदी, तू तर कवयित्री आहेस.

स्पृहाः  प्रवाह हा शतकांचा, प्रवाह हा कीर्तिचा, प्रवाह हा सृजनांचा, प्रवास या मातीचा

कर्तृत्वाचा गंध त्याला, आपुलकीचा छंद, दिशादिशांना भेदून जातो प्रवाह हा स्वच्छंद,

किती लाभले प्रवाहास या अस्सल कीर्तिवंत, लाख संकटे आली तरीही प्रवाह हा अखंड!

मला अतिशय आवडला हा शॅडो ॲक्ट. आपण सगळे जण या प्रवाहाचा एक घटक आहोत ही

कल्पनाच किती सुखावणारी आहे.

जितेंद्रः आवडला? आता पुढे तर आणखीन मजा असणारे.

स्पृहाः काय आहे? आणि पुढे म्हणजे कधी?

जितेंद्रः पुढे म्हणजे प्रत्येक टप्प्यावर. आपण कार्यक्रमच तसा बांधलाय. जाऊ दे तो पर्यंत टाईमपास करु!

स्पृहाः काय?

जितेंद्रः एकदा पाडवा म्हण पाडवा. (ती चक्रावते.) आपण नाही का लहानपणी खेळायचो. पाडवा म्हण पाडवा. नीट बोल गाढवा. तशी मला जरा, धमाल करायची लहर आली. कारण सण म्हणजे फक्त संस्कार नाही, सण म्हणजे धमाल, मजा मस्ती! तुला सांगतो आम्ही सगळी भावंड जमलो की घराची अक्षरशः मंडई व्हायची. कुणी नवीन पेन दाखवायचा, कुणी नवीन सायकल. मला आठवतंय आयुष्यात पहिला कॅरम आणि कॉम्प्युटर मी गुढी पाडव्याला पाहीला होता.

स्पृहाः माणसं एकत्र जमली की मजा येणारच. प्रत्येकाचा स्वभाव, वृत्ती, वागण्या बोलण्याची पध्दत आणि मुख्य म्हणजे आपण कुठून आलोय त्याचं बॅगेज.

जितेंद्रः म्हणजे?

स्पृहाः म्हणजे अशी कल्पना कर की बिल्डींग मधल्या एकानी खास गुढी पाडव्या निमित्त नवीन फोर व्हीलर घेतली आहे. तर पुण्यातली लोकं कशी बोलतील? मुंबई? कोल्हापूर? नागपूर? आणि कोकणात?

जितेंद्रः हे मी करुन दाखवणार!! पुण्यात गाडीकडे पहात, (लांब पॉज घेतो.) बरी आहे. लाईट जरा मोठे पाहीजे होते. चांगली आहे, लेगस्पेस थोडी जास्त असती तर मजा आली असती. (थांबून) आणि मग जाता जाता, कलर कुठले कुठले होते? म्हणजे त्या घेणाऱ्याला ही गाडी कुठून घेतली असं वाटावं. मुंबईत आधी किती लोक खाली येतील हीच शंका. बाल्कनीतनंच मस्त आहे! छान! पेढे दया. आणि मग बरोब्बर एखादा, उदया कितीला निघणारात ओ ऑफीसला? असं विचारणार. कोल्हापूरात तर काही विचारायला नको. त्या गाडीवर मारुन बघणार आधी. गाडीच्या टपावर नाही ते दणके घेणाऱ्याच्या काळजावर बसत असतात. गाडीला रेलून विचारणार केवढयाला पडली? असं की शेजारनं भाजीच आणलीये. घेणारा खरी किंमत सांगतो. काय राव अशा वेळेला सांगायचं की! साठ सत्तर तर असे कमी करुन दिले असते. हयाच्या घरचीच शो रुम जशी काय! नागपूरचे म्हणजे तब्येतीत जमणार, गाडी कडे निरखून पहाणार आणि हळूच शेजारच्याला काय बे, फोर व्हीलरचे रेट कमी झाले म्हने! कोणीही घ्यून राहला रे. आणि कोकणात, आहा हा कोकणात काय

सांगावं, आख्खी वस्ती जमेल गाडी बघायला. बाकी कुणी काही म्हणायच्या आत पहिली रिॲक्शन "एक बाकी बरं आहे बाबा, पंचर चं दुकान जवळच आहे." गाडीच्या चाकांआधी ऐकणाराच सपाट. पण हीच तर गम्मत आहे. स्वभावांची, माणसांची. अशीच गम्मत आता अनुभवायला मी आमंत्रित करतो विनोदाची गुढी उभारणाऱ्या आपल्या लाडक्या स्टार कलाकारांना. सादर करतोय,

दोघे मिळूनः नीट बोल गाढवा!

## (विनोदी स्कीट १ः )

---

स्पृहाः आपल्या कार्यक्रमात आत्तापर्यंत आठवणीतला पाडवा झाला, शॅडो ॲक्ट झाला, सुरांची बरसात झाली, गम्मत जम्मत झाली, पण काहीतरी मिसींग आहे. काय मंडळी? मला वाटतंय, नव्या नात्यांची नवी गुढी उभारताना, काही जुन्या नात्यांना थोडं जवळ आणलं तर? थोडा प्रेमाचा शिडकावा झाला तरं?

जितेंद्रः हे शब्द ऐकायला जाम भारी वाटतात. शिडकावा. मघाशी तू काय म्हणालीस माग? आपसूक! कार्यक्रम संपेपर्यंत व्होकॅबलरी वाढणारे माझी. घराघरात लहान मुलं आपल्या आई वडलांना नक्की विचारतील बघ या शब्दाचा अर्थ! आई सांग ना आपसूक म्हणजे? ओ बाबा शिडकावा म्हणजे?

स्पृहाः (हसत) शिडकावा म्हणजे स्प्रे. म्हणजे आपण एखादया लग्नात जातो आणि आत जाताना बरोब्बर आपल्यावर त्या गोल मशीन मधून गुलाब पाणी बरसतं, अगदी तसंच, प्रेमाच्या भावनेत भिजवून टाकणारा हा शिडकावा खास आपल्या साठी प्रवाह कुटुंबाच्या ा कलाकारांसोबत! घेऊन येतायत आपल्या सर्वांचे लाडके, दुर्वा केशव, रुषी रुंजी आणि कल्याणी समीर!

जितेंद्रः वैधानिक सूचना. प्रेमाची ही नशा अनुभवणं आरोग्यास हानिकारक नाही.

## (स्टार प्रवाह कलाकार ॲक्ट २ः डान्स ॲक्टः दुर्वा केशवः रुषी रुंजीः  कल्याणीः समीर)

---

जितेंद्रः आता, असाच आपल्या कलेनं गेली वर्षानुवर्ष तमाम महाराष्ट्रावर सुखद शिडकावा करणाऱ्या... (स्पृहाला) जमलं?

स्पृहाः अगदी!

जितेंद्रः खास व्यक्तींसाठी हा पुढचा सन्मान. आम्हाला वाटतंय, नव्हे खात्री आहे की तुम्हाला हा सन्मान स्वीकारताना पाहून अनेकांना नवं काम करण्याचं बळ आणि उर्जा मिळेल. पुढचा सन्मान अशाच एका मनस्वी दिग्दर्शकाला ज्यानं मराठी व्यावसायिक रंगभूमीची समीकरणंच बदलून टाकली.

स्पृहाः गेली तीस वर्ष कर्मशिअल नाटकात खऱ्या अर्थानं एक्सपेरिमेंटल असणाऱ्यापैकी आघाडीचं नावं म्हणजेच चंद्रकांत कुलकर्णी. अर्थात आमच्या सगळयांचे लाडके चंदू सर. त्यांच्या याच प्रयोगशीलतेचा आणि अथक नाटयनिर्मीतीचा सन्मान आज आमच्याकडून...मी नितीन वैदय आणि आपले दादासाहेब यांना विनंती करतो त्यांनी हा सन्मान दयावा.

## प्रवाह रत्न ५: चंद्रकांत कुलकर्णी

जितेंद्रः आता चंदू सर सन्मान करतील, नव्या पिढीतील अतिशय महत्वाच्या दिग्दर्शक मोहीत टाकळकर यांचा. आसक्त या संस्थेकडून गेली अनेक वर्ष मोहीत नं महत्वाची नाटकं बसवली आहेत. नवं काहीतरी सांगणारी, व्हिज्युअली अप्रतिम, आशय दृष्टया संपन्न आणि थिएटरवाल्यांच्या भाषेत चकचकीत प्रॉडक्शन असलेले हे दोन्ही दिग्दर्शक. यांच्यात अजून एक कॉमन गोष्ट आहे! ती म्हणजे... मी! मी दोघांसोबतही काम केलंय! (हसत) मी आमंत्रित करतो मोहीत टाकळकर यांना!

## प्रवाह रत्न ६: मोहीत टाकळकर

स्पृहाः आपले पुढचे सन्मानार्थी महाराष्ट्राच्या फार मोठया लोकधारेतून आलेले, विनोदाची शिंदेशाही पगडी डोक्यावर घातलेले, स्त्रियांच्या मनात काय चाललंय हे अचूक ओळखणारे आणि सही रे सही पासून ढॅण्टढॅं पर्यंत धमाकेदार मनोरंजन करणारे, आणि लेखक दिग्दर्शक केदार शिंदे! त्यांना रंगमंचावर आमंत्रित करते. पुन्हा एकदा त्यांचा सन्मान करतील पुढंच पाऊल या मालिकेचे निर्माते विदयाधर पाठारे!

## प्रवाह रत्न ७: केदार शिंदे

जितेंद्रः ज्याच्या विनोदानं, टायमिंगनं आख्ख्या महाराष्ट्राला वेळोवेळी संतोष होतो. ज्यानं एकदा यदा कदाचित असं म्हणलं आणि मराठी नाटकाला हाऊसफुल्लचे बोर्ड लागले, त्या संतोष पवार या हरहुन्नरी लेखक दिग्दर्शक आणि कलाकाराला हा मानाचा सन्मान केदार सरांच्या हस्ते!

## प्रवाह रत्न ८: संतोष पवार

स्पृहाः यानंतर पुढचा सन्मान!

(प्रेक्षकातून दर्शन समोर येतो. छानशा मिडल क्लास वेशामध्ये.)

दर्शनः थांबा, पुढचा सन्मान मी देणार आहे.

जितेंद्रः तुम्ही कोण आहात?

दर्शनः मी प्रेक्षक आहे, मराठी रंगभूमी आणि सिनेमावर प्रेम करणारा. मला माहीतेय पुढचा सन्मान तुम्ही कुणाला देणार आहात, आणि माझी इच्छा आहे, की हा सन्मान महाराष्ट्रातल्या तमाम प्रेक्षकांनी दयावा.

स्पृहाः अहो पण तुमचं नाव गाव, चेहरा...

दर्शनः मॅडम, प्रेक्षकाला चेहरा नसतो. फक्त हात असतात, जे एखादी कला नाही आवडली की कलाकारांचा कान धरतात, आणि आवडली की टाळयांची दाद देतात. माझ्यासोबत आज इथं बसलेले दोन प्रेक्षक आणतोय. खास या कलाकारासाठी, या सन्मानासाठी!

(दोघांना घेऊन स्टेजवर येतो.)

दर्शनः कलाकार आणि माणूस दोन्ही म्हणून एखादयानं कसं असावं याचा आदर्श असलेले, लोक नटांची नावं स्वतःला ठेवतात पण संस्कृत मध्ये नटाला यांच नावं आहे, ते म्हणजे...भरत! महाराष्ट्राच्या सगळया प्रेक्षकांच्या वतीने हा सन्मान भरत जाधव यांना! केदार शिंदे आणि अंकुश चौधरी यांनीही वर यावं, म्हणजे आम्ही तीन, तुम्ही तीन!

**(केदार अंकुश आणि भरत जाधव एका फ्रेम मध्ये.)**

**---------------------------------------------------------------------------**

स्पृहाः यानंतर...

(जोरजोरात गाण्याचा आवाज ऐकू येतो. स्पृहा आणि जितेंद्र तिकडे पहातील आणि अतिशय रावडी नाचत भूषण आणि हेमंत एन्टर करतील. जितेंद्र आणि स्पृहा चिडतात.)

जितेंद्रः बापरे ! मंडळी माफ करा आम्हाला कार्यक्रम सोडून मधूनच जावं लागतंय. कारण आता इथं थांबणं शक्य नाही.

स्पृहाः चल, मी नाही थांबणार आणि यांना समजावयाच्या फंदातही पडणार नाही!

जितेंद्रः (टेन्स्ड होऊन, चिडून) खरंतर आम्हाला हे निवेदन सोडून जायचं नव्हतं, पण इथं आम्हाला या गोष्टींना तोंड दयायला लागेल वाटलं नव्हतं, आणि हे आम्हाला बघवणार नाही!

(स्पृहा आणि जितेंद्र एक्सीट घेतात. हे दोघे नाचतच आहेत. अचानक अतुल परचुरे एन्ट्री घेतो.)

## (विनोदी स्कीट २ः शोभायात्रा.)

---

स्पृहाः खरं आहे, फक्त थिल्लर पणा, हुल्लडपणा म्हणजे मनोरंजन नाही, आणि थिल्लरपणे नाचणारी, किंवा हुल्लडपणा करणारी लोकम्हणजे तरुणाईही नाही.

जितेंद्रः तसंही तरुण असणं ही शरीराची नाही मनाची अवस्था आहे. माणूस वयानं कितीही असला तरी मनान तरुण असूच शकतो. अशाच सगळया वयोगटातल्या प्रेक्षकांना, आपल्या गाण्यातनं तरुण बनवायला येत आहेत, पहिल्यांदाच एकत्र, एका मंचावर, यंग आणि डायनामिक गायक रोहीत राऊत आणि स्वप्नील बांदोडकर!

**(स्वरांची गुढी २ः रोहीत राऊत, स्वप्नील बांदोडकर)**

## (एंड फिनालेः प्रथमेश, रोहीत, स्वप्नील, राहुल, मराठी अभिमानगीत)

---

(या नंतर रंगमंचावर कोणीही नाही. डोक्यावर खरी खुरी आंब्याची पेटी घेऊन थेट दर्शन आत येतो. इकडे तिकडे पहातो. जितेंद्र शांतपणे त्याच्याकडे पहातो.)

जितेंद्रः सावंत साहेब, ओ सावंत साहेब या. ठेवा ती पेटी.  (दर्शन पेटी ठेवतो.) हे सावंत साहेब कोकणातल्या बागेतून थेट आपल्या कार्यक्रमात.

दर्शनः हां. पहिली पेटी देवासमोर ठेवलीन अन दुसरी उचलून आलो तडक घेऊन. सुरु? कधी झाला?

जितेंद्रः झाला एक अर्धा तास. काय हो? हापूस का?

दर्शनः (पेटी फोडतो. दोन गरगरीत आंबे काढतो.) ओळखून बोला. पायरी.

जितेंद्रः आंबा विकणाऱ्या माणसाला आंब्यावरच्या किडी नंतर सगळयात जास्त त्रास कसला होत असेल तर तो या प्रश्नाचा. कसे दिले?

दर्शनः सातशे रुपये डझन. अर्धा.

जितेंद्रः डझन का अर्धा?

दर्शनः डझन. अर्धा.

जितेंद्रः भलतच दिसतंय हे प्रकरण. बरं असं करा, आमच्या खाली बसलेल्या मान्यवरांना या मोसमातला पहिला आंबा तुमच्या हातानी दया. दया. घरी घ्यून जातील मस्त कापून खातील. तुमचं नाव काढतील.

दर्शनः सावंत. ए. पी. कोण देणार. पैसे?

जितेंद्रः मी मी देतो. (हळूच) शाळेत बहुतेक कर्ता कर्म क्रियापद वेगळयाच क्रमानं शिकलेत हे.

(दर्शन पेटी घेऊन पुढे जातो. आंबा देतो. प्रत्येक गेस्ट ने हातात आंबा धरलेला दिसतो.)

जितेंद्रः वा वा दादा. सुरुवात तर गोड झाली. आंबा गोड असेल ना?

दर्शनः (कॉन्फीडन्टली) गॅरेंटी. नाही. (थांबतो.) माणसांसारखंच आहे. बाहेरनं चांगले दिसतात सगळे. आतनं सांगू शकता काय? पण आपलं फळ डोळे झाकून खायचं. सगळा एक्सपोर्ट क्वालिटी माल.

जितेंद्रः आंबा कशानी गोड होतो हो एवढा?

दर्शनः आमच्या घामानी होतोनं काय. वर्षभर त्याची निगा राखतो ना खपून. त्यामुळे आम्ही रोड आणि आंबा गोड. पण आपल्याला गोडाशिवाय करमत नायहाँ. जेवायला गोड, ऐकायला गोड. किर्तन ऐकल्याशिवाय झोपत नाही आपण.

जितेंद्रः मग आता काय लगेच जाणार कोकणात?

दर्शनः रात्री. उदया.

जितेंद्रः रात्री का उदया?

दर्शनः आज आता आंबे आणलेन. ते सगळे बाजारपेठेत पोचवलेन. आपल्या लोकांचा पाडवा गोड करायची इच्छा होती, ती केली. कुणी कुणी लेकरांना सांगतं ना या पाडव्याला आमरस करु, आम्रखंड करु. मग म्हणलन आज सकाळी पोचले पाहीजेत आंबे. सातशे पेटया संपल्या. आता रात्री छान बुआंचं किर्तन ऐकायचंनं अन पहाटेच्या गाडीनं रवाना.

जितेंद्रः किती वाजता आहे कीर्तन?

दर्शनः कीर्तनकार माउलींचा मेसेज आला नाहीनं अजून.

जितेंद्रः किर्तनकार माऊलींचा मेसेज ? खरं आहे म्हणा, देवाला जर ऑनलाईन अभिषेक होऊ शकतो तर किर्तनकार सेलफोनवर कीर्तन का करु शकत नाही.

दर्शनः अहो हो, आज त्यांचा ही आज कार्यक्रम आहे. म्हणलं चुकवू नये.

जितेंद्रः योग्य ठिकाणी आलात. अहो इथंच कार्यक्रम आहे त्यांचा. तुमच्या आमच्या साऱ्यांना ज्यानं वेड लावलंय, अशा आजच्या एकविसाव्या शतकाचं, टेक्नॉलॉजीच्या या नवीन अपत्याचं, आधुनिक सेलफोनचं पारंपरिक कीर्तन घेऊन येत आहेत, दोन कीर्तनकार! चला तर मग ऐकूया या संध्याकाळचं मोबाईल कीर्तन!

---------------------------------------------------------------------

**अंधार**

मोबाईल कीर्तनः मृदुंगाचा जयघोष चालू होतो. वाढत जातो. त्याची स्केल वाढते. लय वाढते. मधोमध सुबोध आणि हृषिकेश बडवे उभे आहेत.

हृषिकेशः गाणं सुरु करतो. जय जय राम कृष्ण हरी. जय जय राम कृष्ण हरी सुरु होतं.

त्याचं लय वाढत जाते. वाढत जाते. त्या प्रमाणे कोरीओग्राफी होते. एका सर्वोच्च बिंदूला जाऊन ते थांबत. सुबोध आणि हृषिकेश एकमेकांना नमस्कार करतात. तेवढयात सुबोधचा फोन वाजतो. तो मोबाईल वर पाहून प्रेक्षकांकडे हसून पहातो.

सुबोधः मंडळी, मोबाईल कीर्तन, नावं ऐकायला मोठं अजब आहे, पचवायला जरा गजब आहे, पण काळाचा महिमाच थोर आहे. पोराच्या ताब्यात मोबाईल नाही तर मोबाईलच्या ताब्यात पोर आहे, म्हणलं ना या युगाचा महिमाच थोर आहे. आज संवाद हा धर्म आहे, मोबाईल हे मर्म आहे, आणि चार्जिंग हे कर्म आहे.

तेव्हा, आमचं हे अलौकिक किर्तन सुरु करताना, समस्त मंडळींना एवढंच सांगतो,

दूर करावा मोबाईल I खिशात पडोनी राहील I चित्त जाग्यावर येईल I आपोआप I

फेसबुक चे जंजाळ I टिवटर वरचे पाल्हाळ I व्हॉटस ॲप चे चांडाळ I सायलेंट होती I

रुप आणोनि डोळयात I प्राण आणोनि कानात I नाम घेता व्हावे I एकरुप I

परमानंदी व्हा तल्लीन I त्या विठूरायाशी लीन I हरपतो सारा क्षीण I एकाएकी I

हृषिकेश अंभगाची सुरुवात करतो.

हृषिकेशः या मोबाईल नं आपल्या आयुष्यात जशी क्रांती आणली तसे मोठ मोठे पेचप्रसंगही आणलेत मंडळी! तंत्रज्ञान म्हणलं तर, वरदान म्हणलं तर राक्षस!

सुबोधः बरकां अगदी परवाचाच प्रसंग, शेजारच्या एका मुलाला मी विचारलं म्हणलं सांग बाळा, ज्ञानेश्वर माऊलीनी कुणाचं गर्वहरण केलं होतं. मुलानं माझ्याकडं हसून पाहीलं. असं पाहीलं, म्हणलं आहे, याला उत्तर माहीत आहे. पिढया न पिढया चालत आलेल्या कथांकडे या पुढच्या पिढीचं ध्यान आहे. त्यांना त्याचं ज्ञान आहे, अन मनात त्या विषयी सन्मान आहे. अजून काय हवं?

हृषिकेशः उत्तर दिलं मुलाने?

सुबोधः अहो नुसतं दिलं नाही तर असं दिलं की आम्ही दंग झालो. मी विचारलं, म्हणलं सांग बाळा, ज्ञानदेवांनी, कुणाचं गर्वहरण केलं होतं. तसा त्यावर मुलगा म्हणला काका सोप्प आहे, दोन मिनिटं थांबा, गुगल करुन सांगतो.

हृषिकेशः म्हणजे चांगदेवांचं गर्वहरण होण्या आधी तुमचं वस्त्रहरण झालं.एकेकाळी माणसं बाईल वेडी होती आता मोबाईल वेडी होतायत म्हणजे बघा. आस पास वर खाली जिथं जावं तिथं, सारा माहौल जणू असा काही झालाय.

**(टाळ वाजायला लागतात.)**

ज्याच्या त्याच्या हातात । वाजत असतो दिनरात । जो तो हयाच्या ताब्यात । बंदीवान

आसपास लक्ष नाही । भोवताली असले काही…

म्हणजे काय, कुणी बघता बघता केळयाच्या साल्यावरुन घसरतो, तर कुणी मधला खडडा विसरतो.  आणि मग थेट आत! हारी विठ्ठल!

ज्याच्या त्याच्या हातात । वाजत असतो दिनरात । सारे हयाच्या ताब्यात । बंदीवान

आसपास लक्ष नाही । भोवताली असले काही । वेडयागत जो तो पाही । स्क्रीनवर

ना जगण्याचा आस्वाद । ना कोणाशी संवाद । काय कोणाची बिशाद । याच्याविना

व्यसनापरी हे व्यसन । दिसते त्याहून भीषण । आपण होऊन सुजाण । बोध घ्यावा

हृषिकेशः माणसाला प्राणी उगाच म्हणलेलं नाहीये बरं!  तर या मनुष्य प्राण्याला या मोबाईलनं अगदी धरुन ठेवलाय. आळशी केलाय. कपडे घ्यायचे त्याच्यावर, वस्तू घ्यायच्या त्याच्यावर, लग्नही जमते त्याच्यावर, माऊली काही वर्षात मोबाईलवर मुलं जन्माला येऊन ऑनलाईन संसारही करता येईल! काय माऊली?

(सुबोध मोबाईलवर आहे)

सुबोधः अं! हो! अहो फॉरवर्ड आला होता. डिलीट केला. बंदच करतो. (आत ठेऊन देतो.) असंच होतं,  आई म्हणते मुलाला अरे मोबाईलवर खेळू नको. लक्ष नाही. बायको म्हणते नवऱ्याला अहो आज जेवायला आई वडील येणारेत. नवऱ्याचं लक्ष अॅंग्री बर्डच्या पन्नासाव्या लेव्हलवर. बायको आणखी अँग्री!  फॉरवर्ड पाठवताना कळत नाही, बातमी आहे की अफवा पण खातरजमा कोण करणार? म्हणून वाटतं मोबाईलनं आपल्या सुविधा दिली पण आळशी केलं मात्र. या आळशीपणा बददल फार छान म्हणून ठेवलंय माऊलींनी . अलसस्य कुतो विदया अविदयस्य कुतो धनम, अधन्यसं कुतो मित्र, अमित्रसं कुतं सुखम!  विकीपीडीयावर सगळयाची ढीग माहीती आहे हो, पण ज्ञान नाही. धन आहे पण सन्मान नाही. फेसबुक वर पाच हजार ओळखीचे आहेत पण वेळेवर

मदतीला येतील असे पाच मित्र नाही. आणि ज्याला विदया नाही, ज्ञान नाही, सन्मान नाही, मित्र नाही, त्याला सुख नाही!

म्हणूनच आम्ही ठरवलं हे किर्तन करायचं. आजच्या इथं जमलेल्या आणि टीवीवर पहाणाऱ्या साऱ्यांना त्यांच्याच भाषेत सांगायचं. तर मग ऐका मंडळी, मोबाईलच्या भाषेतच भक्तीभावाची महती! पहा, लक्ष देऊन पहा, प्रत्येकाचं मन म्हणजे मोबाईलचा डिवाईस. कुणाचं जुनं, कुणाचं लेटेस्ट, कुणाचं आठवणीनी भरलेलं कुणाचं स्क्रॅचेस पडलेलं, कुणाचं रिकामं, कुणाचं १ जी बी रॅम सारखं धावणारं,

ह्रषिकेशः अचपळ मन माझे, नावरे आवरीता...

सुबोधः १ जी बी... एका वेळेला दहा गोष्टी उघडून ठेवायच्या! उघडली अॅप्लीकेशन, लाव डाऊनलोडिंगला! मग काय होणार?

ह्रषिकेशः तुजविण क्षीण होतो धाव रे धाव आता...

सुबोधः क्षीण म्हणजे काय? मेमरी लॉस! डेटा करप्ट! हारी विठठल!

कुणाचं मन अचपळ तर कुणाचं ५१२ एम बी सारखं मध्येच अडकणारं. कुणाचं मन दिखाऊ, कुणाचं दणकट, कुणांच एकदम पिटुकलं तर कुणाचं अगदी ठिसूळ. या मनाच्या मोबाईलची बॅटरी म्हणजे सुख! वाटतं आपल्याकडे भरभरुन असावं पण रोजच्या रोज मिळवायला लागतं.

ह्रषिकेशः सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वता एवढे.

सुबोधः व्वा माऊली. सुखाची बॅटरी चार्ज कशी करायची? मोठा गहन प्रश्न आहे. सुखाची बॅटरी चार्ज करायची ती भक्तीभावाच्या चार्जर नी. याच्या पिनाही निरनिराळया. कुठं टू पीन, कुठं थ्री पीन. तसंच आहे प्रत्येकाचं, कुणी माणसांना मदत करतं, कुणी पुण्याचं काम करतं, कुणी देवळात जातं, कुणी घरीच पाकीटातल्या फोटोला नमस्कार करतं. कुणी मनोभावे नामस्मरण करतं. पिना वेगवेगळया पण साऱ्यांचं काम एकच. चार्जिंग!! कसं होणार? म्हणूनच श्रध्देचं, भक्तिभावाचं, पुण्यकर्माचं बटणं ऑन करायचं आणि विसरुन जायचं, बघता बघता वीजे सारखा तो निर्गुण निराकार भगवंत, तेजाचा अंश, तुमची सुखाची बॅटरी फुल चार्ज करेल की नाही पहा. करुन पहा. स्वतःला काही वेळ विसरुन पहा, मनाचा मोबाईल थोडा वेळ बाजूला ठेऊन पहा. इनकमिंग नको आऊटगोईंग नको. होऊ दे त्याला चार्ज. शब्देविण संवादू, दुजेविण अनुवादू.

ह्रषिकेशः पण असं केल्यानं काय होईल?

सुबोधः मनाचा मोठेपणा वाढेल.

हृषिकेशः हे पण सांगा मोबाईलच्या भाषेत. मनाचा मोठेपणा?

सुबोधः एक्सपांडेबल मेमरी! इतरांनाही आपल्या आनंदात मोकळेपणान सहभागी करुन घ्याल. म्हणजे डिवाईस पेअरिंग आणि ब्लूटूथ शेअरिंग. मनातला मळ निघून जाईल, म्हणजे

हृषिकेशः मेमरी क्लिन??

सुबोधः व्वा माऊली व्वा! तेव्हा, आजच्या या आमच्या छोटेखानी किर्तनाचं सार हेच की तुमच्या पुण्यकर्माचा, भक्तीभावाचा एक मेसेज भगवंताकडे पाठवला की त्यावर सुखाची ब्ल्यू टीक आलीच म्हणून समजा!!

पुन्हा अभंग सुरु होतो. पुन्हा त्यावर फेर धरला जातो. ताल धरला जातो. तो क्रिसेंडोला जातो आणि एका सर्वोच्च बिंदूवर हा ॲक्ट संपतो.

---------------------------------------------------------------------------

जितेंद्रः एकदा जोरदार टाळया आपल्या लाडक्या किर्तनकारांसाठी.

स्पृहाः आता ह्रषिकेशला किर्तन करताना पाहून मला वाटलं की एवढया तरुण वयात फार सुंदर किर्तन करतो तो. एका अस्सल परंपरेचा वारसा पुढे चालवतोय.

जितेंद्रः असाच अस्सल मनोरंजनाचा वारसा पुढे चालवणारे नवीन शोज येतायत स्टार प्रवाह वर. जनरली चॅनल म्हणलं की त्याबददलचं बोलणं येतचं पण मला वाटतं स्टार प्रवाह शी या नव्या वर्षात प्रेक्षकांचं नवं नातं जोडलं जाणार आहे. कारण स्टार प्रवाह वर येतायत नवीन मालिका,

ज्यात आहे सगळयांना आवडणारा आशय, सुंदर विषय, रंजक मांडणी आणि महत्वाचं म्हणजे फ्रेश नव्या व्यक्तिरेखा! स्टार प्रवाहच्या कुटुंबात नव्यानं सामील होणाऱ्या सगळयांचं मनःपूर्वक स्वागत. मला खात्री आहे, ही नवीन मालिका पाहून आख्खा महाराष्ट्र या सगळयांचा पाठीवर कौतुकाची थाप मारेल!! पाहूया, या नव्या चेहऱ्यांची नवी कोरी झलक!!

**(न्यू शोः फॉलोअड बाय न्यू शो  ॲक्टः बाय न्यू टीम मेंबर्स त्यांचा सत्कार,**

**जयेश पाटीलः मनोगतः स्टार प्रवाह चॅनल पॉलिसी, नवीन वर्ष)**

**--------------------------------------------------------------------------------**

आता स्पृहा एकटी उभी आहे.

स्पृहाः या नंतर लगेचच याच मंचावर आपण पुढचा सन्मान करणार आहोत स्त्री शक्तीचा. तिच्या विविध रुपांचा अविष्कार आपल्या समर्थ अभिनयानं दर्शवणाऱ्या, सिनेमा आणि नाटक या दोन्ही माध्यमातून तिच्या इच्छा आकांक्षांचा वेध घेणाऱ्या प्रतिभासंपन्न अभिनेत्रींचा! पण त्या आधी एक विशेष सन्मान. स्त्री जशी समाज घडवू शकते तसाच तो सुरक्षितही ठेऊ शकते. आर्मी नेवी एअरफोर्स आणि पोलिस या दलांमध्येही महत्वाची कामगिरी करु शकते. अशाच एका महत्वाच्या कामगिरीला हा विशेष सन्मान, आम्ही देतोय ठाणे शहराच्या ट्राफिक विभागाच्या पोलिस अधिकारी, रश्मीताई करंदीकर यांना. आणि हा सन्मान प्रदान करतील विम बार चे अबक आणि आपल्या लाडक्या अक्कासाहेब!

## विशेष सन्मानः रश्मी करंदीकरः

(जितेंद्र येतो.)

जितेंद्रः धन्यवाद रश्मीताई, धन्यवाद अबक. मी मान्यवरांना बसायची विनंती करतो. मात्र अक्कासाहेब यांनी पुढच्या सन्मानासाठी थांबावं. आता या राज्यातल्या सगळया महिलांना आपल्या वाटणाऱ्या या चारचौघी! सगळयात आधी मी आमंत्रित करतो, गेली अनेक दशकं आपल्या चतुरस्त्र अभिनयानं आपल्याला आनंद देणाऱ्या, रोहिणीताई हटटंगडी! मित्रांनो जेवढं आमचं वय आहे, तेवढा त्यांचा अनुभव आहे, त्या अनुभवाला मनापासून सलाम!

## प्रवाह रत्न ११: रोहीणी हटटंगडी

स्पृहाः रंगभूमी आणि सिनेमा या दोन्ही माध्यमात विविध भूमिका जिवंत करणारी, हिंदी, मराठी सह वेगवेगळया भाषेतल्या सिनेमांमध्ये आपला ठसा उमटवणारी. अभिनयातलं वैविध्य, विचारांची उत्तम बैठक, आणि माणूस म्हणून असलेली संवेदनशीलता म्हणजेच सोनाली कुलकर्णी. तिला हा सन्मान प्रदान करतील रोहीणी ताई हटटंगडी!

## प्रवाह रत्न १२: सोनाली कुलकर्णी

जितेंद्रः या नंतर, पुढचा सन्मान अशाच एका अभिनेत्रीचा जिच्या भूमिकांचा ठसा महाराष्ट्रातल्या तमाम रसिकांच्या मनावर आजही तितकाच ताजा आहे. सचिनचं कसं,फॉरमॅट कोणताही असो, टी टवेंटी, वनडे, टेस्ट तो बॅटींगच करणार तसंच यांचा सिनेमा, नाटक, सिरीयल, जाहीरात

कोणताही फॉरमॅट असो नीना ताईंचा अभिनय म्हणजे बॅटींगच! यानंतरचा सन्मान आहे, नीना कुलकर्णी यांना! नीना ताईंना हा सन्मान देण्यासाठी मी आमंत्रित करते अबक अबक यांना...

## प्रवाह रत्न १३: नीना कुलकर्णी

स्पृहाः नीना ताई ही झाली नाण्याची एक बाजू, याच नाण्याला दुसरी बाजू पण आहे. म्हणजे छापा काटा असलेल्या या नाण्याची दुसरी बाजू आहे आजची आघाडीची अभिनेत्री आणि आता नाटय निर्माती मुक्ता बर्वे! ज्यांच्या प्रत्येक कलाकृतीची रसिक आतुरतेने वाट पहातात अशा मोजक्या कलाकारांपैकी एक म्हणजे मुक्ता!

## प्रवाह रत्न १४: मुक्ता बर्वे

स्पृहाः मला खात्री आहे या सगळया जणींचा सन्मान म्हणजे महाराष्ट्रातल्या प्रत्येक स्त्रीला आपला स्वतःचा सन्मान वाटेल! एकदा महाराष्ट्रातल्या प्रत्येक स्त्री च्या सन्मानासाठी जोरदार टाळया! या सगळया स्त्रियांनी एकदा रंगमंचावर यावं!

**(फ्रेम मध्ये अक्कासाहेब, रश्मी करंदीकर, नीना कुलकर्णी, रोहीणी हटटंगडी, सोनाली कुलकर्णी अशा असतील!)**

**--------------------------------------------------------------------------------**

जितेंद्रः विम बार प्रस्तुत चैत्रचाहूल २०१५ नव्या नात्यांची नवी गुढी, पॉवर्ड बाय लक्स आणि वोल्टारिन ऑईन्मेंट या कार्यक्रमात आता वेळ आलीये पुढच्या बहारदार...

(दर्शन फरची कॅप घालून पांढरे कपडे घालून येतो. त्याच्याकडे गॉगल घालून पहातोय.)

जितेंद्रः मी बहारदारच म्हणलं ना? फर्रेदार नाही ना?

दर्शनः व्हॉट नॉन्सेन्स. इथं ऑरगनाईजर कोने? कुनाचा कार्यक्रम आहे. कोन बघतंय सगळं?

जितेंद्रः अमित फाळके आहेत...

दर्शनः बोलवा त्यांना... सुपारी दयायचीये.

जितेंद्रः अहो, ओ, सांस्कृतिक कार्यक्रम चाललाय इथं. सुपाऱ्या कसल्या देताय?

दर्शनः व्हॉट नॉन्सेन्स. कार्यक्रमाची सुपारी दयायचीये. मी मौजे पडकीवाडीचा सरपंच आहे.

जितेंद्रः तुम्ही सरपंच आहात? वाटत नाही.

दर्शनः गावाच्या विकासासाठी हाड झिजवलीयेत सगळी.

जितेंद्रः काय लहानपणापासनं सरपंच होतात का?

दर्शनः व्हॉट नॉन्सेन्स! दहावीत असल्यापासून समाजकार्याचा वसाच घेतलाय मी. गावात अभिनव उपक्रम केलेत मी. काय काय केलं नाही ते विचारा. टूर डी पडकीवाडी ही सायकलिंग ची स्पर्धा, तरुण गायकांसाठी पडकीवाडी गंधर्व महोत्सव, पडकीवाडी श्री बॉडी बिल्डींग, गेली तीस वर्ष दरवर्षी गणेशोत्सवात एक नाटक, पडकीची झाली वाडी. पडकीवाडीला जेव्हा जाग येते तिथपासनं अगदी मुक्काम पोस्ट पडकीवाडी पर्यंत! ते तर सोडा, आयपीएलचं सातवं वर्ष आहे आता. इंटरनॅशनल पडकीवाडी लीग. मागल्या वर्षी जीमी जीप, या वर्षी हेलीकॅम, पुढच्या वर्षी श्टंपात लाईट, बघा तुमी. दहा बारा हजाराचा तर क्राउड असतो. टीम पण असल्या भारी आहेत एकेक. भोकने आळी इलेव्हन, दोडकेमळा फायटर्स, गुमानेवस्ती वॉरीयर्स, बुजकी विहीर विजार्डस. स्पॉन्सरशिप असती मोठीच्या मोठी! इथं छाताडावर हे स्टीकर हम्मा दूध, खांदयावर खापकर आंबाबर्फी, पोटाला नाचणे टेलर्स, अन मागं आपलं नावं मिशनः आमदारकी, व्हिजनः सरपंच कमलसिंह गुलाबसिंह गोडे पाटील प्रतिष्ठान. आनि खाली लाईन, नावं ऐकलं की गावं पळतंय! हे झालं नुसतं क्रिडाचं, साहेब कलेसाठी तर...

जितेंद्रः ते जाऊ दे, मला सांगा आज कसे काय आलात?

दर्शनः चैत्र पुनवेची गावात जत्रा आहे, दरवर्षी असते. ४० एक हजाराचा फूटफॉल होणार. युनो फुट फॉल? आवक जावक! एन्टरन्मेंटसाठी यंदा मुंबईची लावणी पाहीजे पोरांना. ती पण साधीसुधी नाही. हाय क्लास. मी म्हणलं आणणार. यंदा मुंबईची लावणी आणणार. त्यातपण म्हणजे एक दुसरी मिस इंडीया, एखाद दुसरी मिस इंडीया पॅसिफिक अन एखाद दुसरी मिस इंडीया अर्थ पाहीजे.

जितेंद्रः बजेट परवडेल का मुंबईच्या इंटरनॅशनल लावण्यांचं?

दर्शनः व्हॉट नॉनसेन्स? आमच्या दिसण्यावर जाऊ नका साहेब. आम्ही बंडल मारत नाही, बंडलं काढतो. समोरची कला तेवढी चांगली पाहीजे. गाडी कुठली आणलीये पायली का बाहेर? चित्ता आहे.

जितेंद्रः चित्ता? जॅग्वार असेल! असो. तुम्हाला सांगतो आज असाच जंगी कार्यक्रम आहे बतावणी अन लावण्यांचा. थांबा पहा आणि आवडला तर घ्यून जा गावाला.

दर्शनः म्हणजे आबुराव बाबुराव? आय हाय. मंग तर बघायलाच पाहीजे. पण नाव काय यांच?

जितेंद्रः आबुराव बाबुराव काळे पाटील सह अंजू मंजू रंजू मुंबईकर यांचं लोकनाटय तमाशा मंडळ!

दर्शनः चला, बसू!

जितेंद्रः आँ?

दर्शनः खाली बसू. होऊ दया सुरु, ढोलकीचा तोडा!

ढोलकीचा तोडा सुरु होतो. आणि आबुराव बाबुराव अ‍ॅक्ट सुरु होतो.

## (आबुराव बाबुराव अ‍ॅक्ट)

## (लावणीः अमृता पत्की, सायली भगत! शेवटी दोघी एकत्र!)

---

जितेंद्रः या नंतरचे सन्मान देण्याआधी एकदा जोरदार टाळया, आपल्या बुध्दी आणि सौंदर्याने आख्खं जग जिंकणाऱ्या या महाराष्ट्राच्या लाडक्या मुलींसाठी.

स्पृहाः या नंतरचा सन्मान, कुठलं काम असो, दिग्दर्शन, अभिनय, निर्मीती, यानं झपाटलेल्या एका व्यक्तिमत्वाला, मराठी सिनेमात तंत्रज्ञानाचे एकाहून एक अभिनव प्रयोग करणाऱ्या, धडाकेबाज मनोरंजनाचा धुमधडाका करणाऱ्या

जितेंद्रः खरंतर आम्ही अशी त्यांच्याच कामांची नावं एकत्र करुन ओळख करुन देत नाही, पण हे स्पृहा हे सगळे सिनेमेच इतके जबरदस्त आहेत! (थांबतो.) घ्या! आपल्या सगळयांचे लाडके महेश कोठारे!

## सन्मान १५ः महेश कोठारेः

जितेंद्रः मराठी सिनेमा देखणा कुणी केला असं विचारलं तर सगळयात पहिलं नावं पुढच्या सन्मानार्थीचं येईल! अर्थात संजय जाधव! त्यांच्या कॅमेऱ्याच्या आणि मग दिग्दर्शनाच्या जादू नं एक वेगळचं जग, एक वेगळीच दुनियादारी तयार केली. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर मराठी कलाकार आणि प्रेक्षक यांचे ‘डार्लिंग’ असलेले संजय जाधव!

## सन्मान १६ः संजय जाधवः

स्पृहाः अष्टपैलू या शब्दाला खरं खुरं जागणाऱ्या अनेक मराठी माणसांबददल आपण लहानपणापासून ऐकलंय. पण अष्टपैलूत्व जगणाऱ्या माणसाचा सन्मान करण्याचं भाग्य आज आपल्या सगळयांना मिळालय. लेखन, दिग्दर्शन, अभिनय, गीत, संगीत, नृत्य, संकलन, नुसतं सांगून आपल्याला दमायला होतं, पण त्यांची एनर्जी आणि उत्साह अक्षरशः थक्क करणारा आहे. अशा सिनेमातल्या मास्टर पासून ब्लास्टर बनलेल्या सचिनजींना पुढचा सन्मान! मी जयेश पाटील यांना विनंती करते त्यांनी हा सन्मान प्रदान करावा.

## सन्मान १७: सचिन पिळगावकरः

जितेंद्रः स्पृहा एखादया गोष्टीत भरत आहे, केदार आहे, आणि अंकुश नाही असं होऊच शकत नाही. मला वाटतं हे तीन मित्र नाहीयेत! तीन चेहरे असलेला हा खरंतर एकच माणूस आहे. या रंगमंचावर आज या तीनही मित्रांचा सन्मान  करताना आनंद होतोय. आपण बोलवूया महाराष्ट्राचा ‘दर्जा’ नायक, रांगडा आणि तितकाच हळवा अंकुश चौधरी!  मी सचिनजींना विनंती करतो की त्यांनी अंकुशचा सन्मान करावा!

## सन्मान १८: अंकुश चौधरीः

स्पृहाः असं म्हणतात की मराठी माणूस स्वतःची जाहीरात करायला कमी पडतो. पण या मराठी माणसानं स्वतःच्या कामातनंच दुसऱ्यांच्या इतक्या सुंदर जाहीराती केल्या की त्यांनी जाहीरात क्षेत्रात मराठी झेंडा अभिमानानं फडकला. ॲड गुरु, लेखक, दिग्दर्शक, अभिनेते आणि असंख्य तरुणांचं इन्स्पिरेशन अर्थातच भरत दाभोळकर!

## सन्मान १९: भरत दाभोळकरः

जितेंद्रः मी भरत सरांना विनंती करतो की त्यांनी हा पुढचा सन्मान दयावा. हा सन्मान अशा व्यक्तीला आहे जो स्वतः सगळयांना देवा म्हणतो पण त्याचं काम पाहून सगळे त्यालाच हात जोडतात.  जाहीरातींच्या मॅड वर्ल्ड मधून, सिनेमाच्या ग्लॅम वर्ल्ड पर्यंत ज्यानं अथांश प्रगती केलीये, आणि बॉक्स ऑफिस वर नवे रेकॉर्डस बनवलेत असा दिग्दर्शक म्हणजे रवि जाधव! या हरहुन्नरी दिग्दर्शकाला मी रंगमंचावर यायची विनंती करतो!

## सन्मान २०: रवी जाधवः

---------------------------------------------------------------------------

स्पृहाः टेलिविजन या माध्यमाशी आपल्या सगळयांचं किती जवळचं नातं आहे. मला वाटतं हयाला नुसतं टेलिविजन म्हणणं बरोबर नाही.

जितेंद्रः म्हणजे?

स्पृहाः म्हणजे त्याची किती रुपं आहेत बघ ना. टेलिविजन ही एकजादू आहे. जी तुम्हाला एका सेकंदात वेगवेगळया कथांच्या जगांमध्ये घेऊन जाते. टेलिविजन हे टाईम मशीन आहे, जे तुम्हाला कुठल्याही काळात नेतं. मग तो शिवाजी महाराजांचा काळ असो किंवा अग्निहोत्री घराण्याचा शोध. टेलिविजन ही थेरपी आहे, इथल्या गोष्टी पाहून तुमच्या आयुष्यात पण छोटे छोटे पण सकारात्मक बदल होतात. नाती जवळ येतात. टेलिव्हीजन हा एक प्रवाह आहे. ज्याच्यात तुमच्या सुंदर जगण्याचं प्रतिबिंब पहात पहात तुम्हाला पुढं जाता येतं.

स्पृहाः या सोहळयातला शेवटचे सन्मान, या टेलिविजनच्या प्रवाहातल्या रत्नांसाठी! पहिला सन्मान अर्थातच त्याला ज्याचा आदेश महाराष्ट्रातल्या घराघरात ऐकला जातो, मराठी टेलिविजनचा इतिहास जेव्हा लिहीला जाईल तेव्हा हे नाव सुवर्णाक्षरांनी लिहीलां जाईल! अर्थातच आदेश बांदेकर!

जितेंद्रः मी लक्ष्य मालिकेच्या निर्मात्या सुचित्रा बांदेकर यांना विनंती करतो की त्यांनी हा पुरस्कार आदेश बांदकेर यांना दयावा.

## सन्मान १९: आदेश बांदेकर

स्पृहाः पुन्हा एकदा स्त्री शक्तीचा सन्मान कारण तिच्या कॉन्ट्रीब्यूशन शिवाय सगळंच अपूर्ण आहे. जिला पडदयावर नुसतं पाहीलं तरी अनेकांचं स्मितहास्य पल्लवीत होतं, जिच्या निवेदनाची अभिनयाची भुरळ फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर देश विदेशातल्या प्रेक्षकांना आहे, निर्माती म्हणून जिनं अतिशय सेन्सिबल मालिकांची निर्मिती केलीये अशी आपल्या सगळयांची लाडकी ‘पल्लवी जोशी’!

## सन्मान २०: पल्लवी जोशी

---

जितेंद्रः आता कार्यक्रमाच्या या शेवटच्या टप्प्यात आपण आलो आहोत. जसं आपण एखादया फंक्शनला गेलो की एक जागा गाठून आपल्या जवळच्या व्यक्तीशी थोडा वेळ बोलतो तसंच काहीसं हे बोलणं. हे बोलणं तुमच्याशी, तुम्हा प्रेक्षकांशी. हे पत्र तुमच्याशी शेअर करतोय आम्ही.

स्पृहाः प्रिय प्रेक्षकहो, तुम्ही आज हा कार्यक्रम पहाताय. अनेक वर्षांपासून स्टार प्रवाह शी तुमचं नातं जोडलं गेलंय. आम्हाला याहून दुसरी चांगली संधी मिळणार नाही तुम्हाला थँक यू म्हणायची. तुमच्या हातातला रिमोट ज्याला सतराशे साठ बटण आहेत, त्यातल्या एकच बटण दाबून तुम्ही या चॅनलवर थांबता. आम्हाला तुमच्या घरात आणता. याहून आनंदाची गोष्ट कुठली? गेल्या सहा वर्षाच्या काळात आम्ही वेगवेगळे कथा आणि कथाबाहय कार्यक्रम केले. तुम्ही आमचा उत्साह वाढवलात, आमच्या प्रेमात पडलात. तुमच्या टेलिव्हिजनच्या वरच्या कोपऱ्यात असणाऱ्या या स्टारला तुमच्या मनाच्या वरच्या कोपऱ्यात अढळपद दिलंत. येणाऱ्या वर्षात तुमच्यासाठी स्टार प्रवाह अनेक उत्तम कार्यक्रम घेऊन येईल आणि आपल्या नव्या नात्यांची ही नवी गुढी अशीच अखंड दिमाखात फडकत राहील, याची आम्हाला खात्री आहे. हे पत्र संपलं तरी मनोरंजनाचा हा सिलसिला आत्ता कुठे सुरु झालाय.

जितेंद्रः येणारं नववर्ष आपल्या सर्वांना आनंदाचं, समाधानाचं, आणि नव्या नात्यांचं जावो. आणि स्टार प्रवाह वरचा आपला लोभ असाच उत्तरोत्तर वाढत राहो. खास तुमच्यासाठी, या पत्राचा आणि कार्यक्रमाचा शेवट एकाच वाक्याने "कळावे लोभ असावा." त्या आधी भेटूयात या कार्यक्रमातल्या तीन पात्रांना. म्हणजे एकाच व्हर्सटाईल अभिनेत्याला. प्रियदर्शन जाधव!

(दर्शन स्टेजवर येतो.)

स्पृहाः एखादी मैफिल दीर्घकाळ स्मरणात तेव्हाच रहाते, जेव्हा ती आणखी चालू रहावी असं वाटत असतानाच थांबते. आपण थांबण्यापूर्वी ज्यांनी हे सगळं घडवलं त्या आमच्या टीमची ओळख करुन देते. विम बार प्रस्तुत चैत्रचाहूल २०१५ या कार्य्रकमाची संकल्पनाः स्टार प्रवाह क्रिएटिव्ह टिम, ज्ञानेश भालेकर आणि क्षितिज पटवर्धन. संहिताः क्षितिज पटवर्धन, स्कीटस लेखनः सचिन मोटे आणि हेमंत ढोमे, दिग्दर्शनः ज्ञानेश भालेकर, निर्मिती संस्थाः संतोष काणेकर यांची अथर्व थिएटर्स, एकदा या सर्वांसाठी जोरदार टाळया! या कार्यक्रमातल्या सगळया कलाकारांना आण स्टार प्रवाह कुटुंबातल्या सगळया सदस्यांना रंगमंचावर येण्याची विनंती करतो.

(सगळे रंगमंचावर येतील.)

जितेंद्रः तेव्हा पुन्हा भेटूया पुढच्या चैत्रचाहूल कार्यक्रमात. नवीन प्रवाह रत्नांसोबत. तोवर एवढंच म्हणू...

दोघेः कळावे लोभ असावा!

दर्शनः आणि लोड नसावा!

**(फिनाले ॲक्टः स्टार प्रवाह नमस्ते नमस्तेः स्टार प्रवाह कॅरेक्टर्स ॲण्ड ॲक्टर्स!)**

क्षितिज पटवर्धन

२ मार्च २०१५, रात्री १२ वाजून १९ मिनिटे